# दिवाळी विशेष अंक २०२४

# 'आकाशकंदिल'

आपला सिंधुनगरी न्यूज चॅनेल

## आपली सिंधुनगरी

**माध्यम जे जपते बातमी सोबत संस्कृती**

## शुभ दीपावली

# 'आकाशकंदिल'



**वैशाली पंडित**
**मुख्य व्यवस्थापक,**
**आपली सिंधुनगरी न्यूज चॅनेल.**

हा 'आपली सिंधुनगरी न्यूजचॅनेलचा' खास दिवाळी अंक आपल्यासाठी सादर करत आहोत.
या अंकात दिवाळी हिच संकल्पना घेऊन संवेदनशील मन जपलेल्या लेखकांनी आमच्यासाठी दिवाळीलेख पाठवले आहेत.
यात प्रकाश तांबे, पुणे, गौतम पंगू अमेरिका, वसुंधरा पर्वते अमेरिका,.वासवदत्ता अग्निहोत्री ग्वाल्हेर, सुगंधा शिरवळकर पुणे,तन्वी पाटकर, कुडाळ.यांच्या लेखांचा समावेश आहे.
प्रत्येक लेखातली दिवाळी वेगळी आहे.अर्थात या उत्सवी सणाचा आनंदही वेगवेगळा आहे.कसा तो आपण वाचणारच आहात.या अंकाचे वैशिष्ट्य हे आहे की,कोकणातल्या लाल मातीतली दिवाळी,पुणे शहरातल्या मध्यमवर्गीयांची दिवाळी, बृहन्महाराष्ट्रातली दिवाळी आणि अगदी थेट अमेरिकेत रूजवलेली,रूजलेली दिवाळी असे दिवाळीचे विविध रंग आपल्याला दिसतील. बालपणातली दिवाळी आठवतांना काही लेखकांना अभावातली दिवाळीही आनंद देऊन गेली,काहींनी मध्मवर्गीय सुखवस्तू बालपणाचा अनुभव सांगितला.मध्यप्रदेशातल्या संस्थानी दिवाळीचा अनुभव या आंकात आहेच पण त्याचबरोबर महाराष्ट्रातली दिवाळी परदेशातही कशी साजरी होते,विविध देशांतल्या लोकांनाही कसं दिवाळीचं आकर्षण निर्माण झालं ,मराठी लोकांनीपुढच्या पिढीला हा वारसा सुपूर्द करताना त्यात आणखीही आनंदाचे प्रवाह कसे सामावून घेतले याची मनोरंजक हकीगत या अंकात वाचायला मिळते. नव्या पिढीला विचारांची दिवाळी देणारी सुप्रसिद्ध अभिनेता श्री.अभय खडपकर यांची शब्दांकित केलेली फोनवरील मुलाखत हे या अंकातील अजून एक वैशिष्ट्य आहे.
श्री.अमेय पंडित यांची पिकल्या पाना ही कविता सृजनाचा देठ हिरवा आहे हा आशावाद निर्माण करणारी आहे. आमचे सगळेच लेखक आपापल्या क्षेत्रात नामांकित आहेत.कार्यमग्न आहेत.तरीही आकाशकंदीलासाठी त्यांनी आपले साहित्य आपुलकीने देऊ केले. आपली सिंधुनगरी न्यूज चॅनेल या सगळयांच्या निरंतर ऋणात राहील.
दीपावली २०२४ ही आमच्या सर्व सबस्क्रायबर्सना, लेखकांना,वाचकांना आणि आमच्यावरा विश्वास ठेवणा-या जाहिरातदारांना सुखसमृद्धीची होवो,सगळयांना आरोग्य आणि मन:शांती लाभो हीच दीपत्कारक्षणी प्रार्थना !

# " पिकल्या पाना "

पिकल्या पाना
विझू नको ना
अजून आहे रेखिव रेषा
बोल सुखाने
मनी उमटती
त्या शब्दांची सोपी भाषा

किती ऋतूंच्या
पुण्यरसाने
भिजवत गेल्या चढत्या वेळा
तसा गलबला
सजला वृक्षी
गोतगणांचा हसरा मेळा

उन्हे सोसली
तरी राखली
हिरवाईची कुपी उराशी
दवथेंबांच्या
स्पर्शापाशी
ओल शोधली कधी जराशी

जीवन मार्गी
असे भासता
वादळवारा घाली घाला
अवचित तुटता
सगेसोयरे
कशा रोखल्या आसवमाला

सगळे सगळे
सांगत अंती
दे वागवण्या मूलमंत्रही
पिवळे होता
गळून जावे
कसे तृप्तता भरून देही




**अमेय श्रीनिवास पंडित**
**( कोल्हापूर )**


आपली सिंधुनगरी
दीपावली २०२४
दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा.
शुभेच्छुक : मे. दिलीप जनार्दन बांदेकर
किराणा मर्चंट, सोमवार पेठ मालव, 9404442955
फ्रोझन फूड, किराणा, आणि मालवणी
मेवा मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण


रापण
Experience Darya
Delicious Sea Food
Authentic Malvani
Punjabi
Chinese
Address : Wairy Bhutnath, Malvan
Contact : Bhushan Satam - +91 9422435698


दीपावली २०२४
दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा.
शुभेच्छुक : श्री. संतोष लुडबे.
(समाजसेवक, वायरी मालवण)


दीपावली २०२४
दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा.
शुभेच्छुक : श्री. रंजन तांबे

# कलावंताची ' अभय ' मुद्रा



**अनुभव कथन - श्री.अभय खडपकर**

**शब्दांकन- वैशाली पंडित.**

आमचा सिंधुदुर्ग म्हणजे कलेचं एक समृद्ध दालन आहेया दालनात अनेक कलावंतांच्या अलौकिक प्रतिभेची दिवाळी साजरी झाली आहे. होत आहे. याच दीपावलीतला एक आकाशकंदील म्हणजे अभिनेता 'अभय खडपकर.'

दृश्यम या हिंदी चित्रपटातली कंडक्टरची भूमिका कुठलाच संवेदनशील माणूस विसरू शकत नाही. एस्टीमध्ये वरीष्ठ लेखाकार म्हणून कार्यरत असतानाच त्यांनी अभिनयाची वाटचालही सुरूच ठेवली होती. दोन हिंदी चित्रपट,तेरा मराठी चित्रपट,चारमालिका,तीसेक एकांकिका,वेबसिरीज,नाटके,स्वत:चा ऑर्केस्ट्रा अशा विविध माध्यमातून त्यांनी आपली मोहोर उमटवली आहे.सध्या ते स्टार प्रवाह वाहिनीवरच्या 'लक्ष्मीच्या पावलांनी'या मालिकेत नायिकेच्या वडिलांची दिनकर खरे यांची भूमिका साकारत आहेत.अभय सांगतात की त्यांचं बालपण लाडाकोडात गेलं.एसटीत असलेल्या वडिलांचा पगार तुटपुंजा होता तरी आई वडील दोघांनीही मुलांना त्याची झळ लागू दिली नव्हती.त्या दोघांनी आपल्या वर्तणुकीतून जे संस्कार दिले त्यांचाच प्रभाव अभयजींवर आजतागायत आहे. बालपणी कणकवलीत ते ज्या हुन्नारे चाळीत रहायचे ती चाळ म्हणजे जणू मिनी मुंबईच होती.सगळ्या जातिधर्माचे लोक तिथे एकमेकांच्या आधाराने रहात होते.विशेषत: तिथे असणारे चौहान हे सधन गुजराती कुटुंब तर बाकिच्या मंडळीना आर्थिक मदतही वेळोवेळी करत असे.त्याचा कुठेही कधी गाजावाजा करत नसे.

चाळीतली दिवाळी अभयना आठवते.त्यांचे जवळजवळ वीसपंचवीस खेळगडी होते. सगळ्या मुलांना एकत्र करून चाळीतले यशवंत परब आणि भास्कर गोडकर हे शेजारी आकाशकंदील करायला शिकवायचे.त्यातही कल्पकता असायची.स्वत: तयार केलेला बांबूच्या कामट्यांचा आकाशकंदील तेव्हा प्रत्येक दारावरची रोषणाई होतीच पण आजही त्या दोघांच्या आठवणीचा कंदील अभय विसरू शकत नाहीत.

चाळीतल्या सगळ्या बायका एकत्र येऊन फराळाचे पदार्थ तयार करीत असत.चाळीत कोणी आजारी असले तरी त्यांच्या घरची चूल थंड पडत नव्हती.आजुबाजुच्या गृहिणी आपुलकीने येऊन स्वयंपाक रांधून जात असत.

अभिनेता म्हणून अभय खडपकरांची ओळख निर्माण झाल्यावर दिवाळी हा सण फार क्वचितच घरी साजरा करता येतो.मात्र याची खंत अभयजींनाही वाटत नाही आणि त्यांच्या कुटुंबियांनाही वाटत नाही.याबाबत अभयजींना आपल्या पत्नीचं.. सीमाचं,मुलगा हिमांशु,कन्या आर्या यांचं मनापासून कौतुक आहे.आपला नवरा,आपला मुलगा,आपले बाबा हे दिवाळीदिवशी मातब्बर कलावंतांच्या सहवासात असतात हीच खरी दिवाळी आहे असं त्यांच्या कुटुंबातील सगळयांनाच वाटतं.
रंगभूमी असो वा छोटामोठा रूपेरी पडदा असो,ही मोहनगरी आहे.या मोहनगरीत ईर्ष्या,स्पर्धा,वासना कामना,प्रलोभनं यांचे फटाके अहोरात्र फुटत असतात.झगमगाटाचे लाखो दिवे खुणावत असतात.या आभासी दिवाळीतही स्वत:ची पावलं ठाम ठेवणं,निष्ठेनं आणि शंभर टक्के निर्व्यसनी राहून अभिनयाचे पैलू सादर करणं ही सोपी गोष्ट नाही.पण अभय खडपकर या जातिवंत अभिनेत्याला ते जमले आहे.नव्हे प्राणपणाने त्यांनी जपले आहे.याचं श्रेय ते नि:संशयपणे स्वामी विवेकानंदांच्या विचारांना देतात.स्वामी विवेकानंदांच्या साहित्याचा,शिकवणीचा परिणाम वयाच्या पंधरा सोळा वर्षांपासूनच आपल्यावर झाला असं अभयजी सांगतात.
वय वर्षे पंधरा सोळात पौगंडावस्थेतल्या मुलामुलींच्या वाचनाचा स्तर कसा असावा याचा हा आदर्श वस्तुपाठच आहे.
कामाच्या धडाक्यात घरची दिवाळी लांब राहते पण मग सेटवरची दिवाळी कशी असते या प्रश्नावर अभयजींनी खुलासेवार माहिती खूपच उत्साहाने दिली.ते म्हणाले की,सेटवर अभिनेत्यांबरोबरच दिग्दर्शक चमू असतो,छायाचित्रकार असतात,क्रिएटीव्ह डिरेक्टर मंडळी असतात,कॉस्च्यूम डिझायनर,प्रॉडक्शन टीम असते.,मजूरवर्ग असतो,यातला प्रत्येकजण आपल्या कामात निष्णात असतो.सगळयांचीच दिवाळी सेटवर एकत्र साजरी होते.
प्रॉडक्शनचे लोक सगळया कलाकार आणि पडद्यामागच्या मंडळींना एक 'टास्क' देतात.मालिकेच्या सेटवर आकाशकंदील तयार करायचा.आयता आणायचा नाही.त्यावर मालिकेचं शीर्षक किंवा एखादा विशेष सीन आठवेल असं काहीतरी दिसायला हवं.मग सगळेजण आपापलं डोकं लढवून सहकार्याने दिमाखदार आकाशकंदील तयार करतात.हे करताना कोणी मोठं नसतं किंवा छोटं नसतं.सगळे खेळीमेळीने काम करतात.याला कोणीही वर्कलोड समजत नाहीत.
मालिकेमध्ये दिवाळीचा सीन आवर्जून योजला जातो.या दिवशी सगळे उत्सवी वेषात येतात.विशेषत: स्त्री कलाकार गोडधोड घेऊन येतात,सगळ्यांना आग्रहाने खाऊ घालतात.सगळे एकमेकांना दिवाळी शुभेच्छा देतात.(रूपेरी पडद्याच्या भाषेत एकमेकांना 'हग ' करतात.

मराठमोळ्या अभय खडपकरांना हग या शब्दाचा आणि एकूणच या प्रकरणाचा विलक्षण संकोच वाटतो.)

रसिकहो,ही आहे आपल्यातल्या एका हरहुन्नरी,संस्कारी आणि कार्यप्रवण अभिनेत्याची दिलखुलास मुलाखत.

कामाच्या व्यग्रतेतूनही 'आपली सिंधुनगरी न्यूज चॅनेलच्या' स्नेहाखातर त्यांनी भ्रमणध्वनीवरून त्यांचे दीपावली विशेष विचार मांडले आहेत.ते मांडताना आपल्या आयुष्यातल्या पारिवारिक चढउताराबद्दलही ते बोलले पण त्यातही त्यांची वैचारिक तटस्थता दिसून आली.संयमित जिजिविषा दिसून आली.

अभय खडपकर यांना आपली सिंधुनगरी न्यूज चॅनेलकडून धन्यवाद आणि त्यांना दिवाळीसाठी भरभरून शुभेच्छा !



# दिवाळी अभावातली आणि प्रभावातली

लक्ष दीप उजळीत आली दीपावली!. दिवाळी आनंदाचा, उत्साहाचा, दिव्यांचा आणि मांगल्याचा सण.

मी माझ्या लहानपणी अनुभवलेली दिवाळी आणि आजची अनुभवत असलेली दिवाळी, यात जमीन अस्मानाचा फरक जाणवतो. आमची त्यावेळची परिस्थिती अत्यंत गरीबीची. तरीपण या गरीबीतील दिवाळीही अगदी जिव्हाळ्याची वाटायची. नारळ, सुपाऱ्या विकून जे काय मिळायचे तीच काय ती पुंजी. दिवाळीपूर्वी काही दिवस आधीच भात कापणी सुरू होते.

या दिवसात लोकांच्या कुणग्यात जाऊन भात कापण्यापासून ते झोडण्यापर्यंतची कामे आई करायची. त्यामुळे आम्हाला भात मिळायचे.

ते भात  भिजत घालून दुसऱ्या दिवशी उपसायचेआणि पहाटेच चार कि. मी अंतर पायी चालत त्या भाताची मोटली पोह्यांच्या गिरणीवर न्यायची... पोहे कांडपासाठी ही sss गर्दी असायची. पुरा आसमंत पोह्यांच्या  वासाने धुंद अस असायचा. चार चार पोहे तोंडात टाकत राहणे हा प्रत्येकाचा उद्योग चाललेला असायचा. .. त्याची चव अजूनही जिभेवर रेंगाळत आहे.



पहाटे गेलो तरी रात्र व्हायची पोहे मिळे पर्यंत...
मग मी तिथेच नातेवाईकांकडे राहायचे. माझ्या मैत्रिणीही जवळ पास असल्यामुळे धम्माल करायचो..पोहे हातात मिळाल्यावर धावत पळत घर गाठायचे.. आई ते पोहे सुपाने पाखडून, कुठे भाताचा गोटा किंवा अन्य काही असेल तर नीट करून डब्यात भरून ठेवायची ...
आणि वाट पाहिली जायची चाव दिसाची.
म्हणजेच नरक चतुर्दशीची. याच दिवशी तर देवाला नैवेद्य दाखवून इतरांनी पोह्यांची उष्टावन करायची असायची.
पाऊस संपलेला असायचा. त्यामुळें प्रत्येक घराच्या समोरचे अंगण साफ करून खळा करणे सुरू व्हायचे. क्रिकेटची बॅट जशी असतें तसे लाकडी जाड फळीचे पेटणे घेवून ते अंगण पेटायचे..(चोपायचे) भरपूर चोप खाल्ल्यावर ते खळे गुळगुळीत व्हायचे. कौतुकाने घरधणीन म्हणायची,"माझ्या खळयात त्याल जरी ओतला तरी ता भरुक येयत."  अंगण चोपून चापून बनवणाऱ्या पुरुषांना ही दाद असायची.. मग त्यावर शेण सारवायचं .
शेडीने (पांढरी माती) त्यावर सुंदर नक्षी काढायची. ही टिकाऊ रांगोळी अंगावर लेवून अंगण दिवाळी साठी सजायचे. कारीटे गोळा करून तुळशी समोर ठेवायचो.आईं यातील काही कारीट आणि झेंडूच्या फुलांनी बनलेली माळ न्हाणीतील हंड्याला बांधायची.

पहाटेच आईं पाठोपाठ उठून आईने ओल्या नारळाचा जो दाट रस काढून तुळशी वृंदावनात ठेवलेला असायचा, तो रस सर्वांगाला लावून निसर्गाच्या सान्निध्यात, दात थंडीने वाजत असताना गरमागरम पाण्याने अंघोळ व्हायची. कोणीतरी दिलेला जुनाच फ्रॉक नवीन समजून घालायचा .काहीं कारीटे ' गोविंदा गो ss विंदा' म्हणत फोडून दोन चार बिया तांदळाप्रमाणे डोक्याला लावायच्या... आणि पोहे भरपू sss र  मिळणार !  या खुशीत पणत्या लावायच्या. आठ दिवस मेहनत करून दादाने बनवलेला बांबूच्या काठ्याचा चौकोनी कंदील उंच बांबूच्या काठीला बसवलेल्या चक्कीवर दोरीने चढवायचा.

**सौ. तन्वी तुळशीदास पाटकर / साटेलकर**
**जि. प. शाळा पेंडूर, सातवायंगणी, केंद्र-मातोंड, ता. वेंगुर्ला,**
**7721889488/ 9545783057**

त्यात पेटती पणती असायची.. त्यामुळें तो अलगत वर नेणं कसब असायचं. तो नक्षीदार कंदील गोल गोल फेर धरायचा. सगळ्यांच्या अंघोळी उरके पर्यंत धुनळया(झुंजुमुंजू) दिसायचं.बाबा अगरबत्ती, नारळ आणि कोयता घेऊन

सातींग(सात्विण) या झाडाची साल आणण्यासाठी जायचे. सातिंग या झाडाची पूजा करून त्याची साल काढायचे .तोपर्यंत इकडे घरात आई ह्या SS एवढ्या SS मोठ्या पातेल्यात गरम पाण्यात पोहे भिजवायची. गूळ , भरपूर ओलं खोबरं घातलेले गोडे पोहे तयार असायचे.चुलीवर एका बाजूने बाजारातून आणलेली रताळी शिजत असायची. बाबांनी पोवलीतून आणलेली साल चांगली धुवून पाट्यावर चांगली चेचायची, त्यात मिरी, लसूण पाकळया घालून रस काढला जायचा. वर्षातून एकदा हा रस कप भर प्यायलाच हवा असा अट्टाहास असायचा. मग वर्षभर पोटाचे आजार होणार नाहीत असे मोठी माणसं सांगायची. कडू कडू रस कसा तरी प्यायचोच... मग सपाटून भूक लागायची. भरपेट पोहे खायचो. सकाळी पाण्याला तळीवर जाणाऱ्या बायका हाक मारायच्या, "खाल्लात गे फॉव?"म्हणत घरात डोकावायची. मग आई तिला आग्रहाने 'चार फॉव खा' म्हणून वाढायची .आमच्या शेजारी बामणांची आपा आई नावाची आजी होती. ती माझ्या बाबांना हाक मारायची."ए वसंता, पोहे खाऊन जा रे."बाबांबरोबर आम्हीही तिच्याकडे जायचो. घरात कितीही पोहे रगडलेले असले तरी आपा आईने प्रेमाने खाऊ घातलेले सगळे जिन्नस गट्टम करायचो.

त्याच दिवशी 12 बलुतेदारांपैकी काही बलुतेदारांच्या बायका टोपली घेऊन पोह्यांसाठी यायच्या. आई त्यांना प्रत्येकाची आस्थेने विचारपूस करून पोह्यांची वाढलेली पाने द्यायची . सोबत कोणी सुपाऱ्या, तर कोणी नारळ मागायची.तेही द्यायची .प्रत्येक घराकडचे जमा केलेले पोहे हे लोक एका दिवसात कसे काय संपवायचे? असा प्रश्न आम्हाला पडायचा. तेव्हा आई सांगायची ,ही सगळी जण

उरलेले पोहे उन्हात सुकवतात आणि मग हवे तेव्हा चहात भिजवून खातात. खरंच होतं ते. कारण गरीबीच एवढी होती की अन्न वाया घालवणे हा प्रकार माहीतच नव्हता. आम्ही सुद्धा पुढे किती तरी दिवस सकाळच्या नाश्त्याला सुके पोहे चहात भिजवून खायचो. आत्ताही तोंडाला पाणी सुटलं...

खरं सांगायचं तर दिवाळीत लक्ष्मीपूजन वगैरे अनेक सोपस्कार असतात, हे त्यावेळच्या गरिबीत आमच्या गावीच नसायचे. हा! पण गुरांनी गोठा भरलेला असायचा. त्यामुळे भाऊबीजेच्या आदल्या दिवशी म्हणजेच बलिप्रतिपदेला मात्र लगबग असायची;ती म्हणजे आई पहाटेच आंबोळ्यांचे पीठ ठेवायची. आतल्या रात्री गावठी सुरय पांढरे तांदूळ व उडदाची डाळ भिजत घालायची पहाटेच पाट्यावरवंट्यावर हे सगळे तांदूळ, डाळ बारीक वाटायची.

पण उडदाची डाळ पटकन बारीक होत नसायची. नंतर हे सगळं मिश्रण एकत्र करून मोठ्या टोपात ते पीठ ठेवायचे व पेटत्या लाकडाचा निखारा पटकन त्या पिठात टाकून त्यावर खोबरेल तेल ओतून पटकन झाकण लावून तो घट्ट झाकणाने बंद करून ठेवायचा. त्याआधी वाटलेले पीठ एका भांड्यात काढून ठेवायचे. (गुरांची शिंगे रंगवायला). पाच सहा तासात म्हणजेच दुपारीच मस्तपैकी पीठ वर यायचं .त्यालाच पीठ येणे म्हणतात.. कोळसा बाजूला काढून टाकून पुन्हा ते पीठ छान ढवळून घेऊन  चुलीवरच भिडी तव्यावर केळीच्या दंडाऱ्याने तेल लावून आंबोळ्या काढायचे .अशी लुसलुशीत जाडसर आंबोळी झाली तयार!! पहिल्या सगळ्या आंबोळ्या गुरांना खाऊ घालायच्या व नंतर घरातली पंगत बसायची .त्याआधी गुरांच्या गोठ्यातच एक शेणाचा छान पैकी गोठा बनवायचा. कारीटाना नारळाच्या झावळींचे हीर लावून त्यांचे पाय  म्हणून लावायचे. एक गुराखी म्हणजेच राखणदार बनवायचा. दोन भाग करून घमेले बनवायचे त्यात पाणी व खुराक ठेवायचा. असं साग्र संगीत जे जे खऱ्या खुऱ्या गोठ्यात असते ते ते शेणाच्या गोठ्यात असायचे . यथासांग पूजा करून मग घरातील मंडळींना जेवण मिळायचे. हा गोठा बनविताना खूप मज्जा यायची. माहेरी म्हैशीचे दुभते खूप होते; पण 24 वर्षापूर्वी अचानक बाबा गेल्याने आमचा गोठा रिकामा झाला. सासरी मात्र अजूनही छोट्या प्रमाणात का असेना पणआमचा गोठा आहे. त्यामुळे दर दिवाळीला आमची बालपणीची दिवाळी आठवतेच आठवते . कार्तिक शुद्ध द्वादशीला तुळशी विवाह. या दिवशी तुळशीला नैवेद्य दाखवला जायचा.सकाळी पुन्हा एकदा अंगण सारवण करून लख्ख करायचे. या दिवशी आवळे व चिंचा तुळशी वृंदावनात आणून ठेवायच्या .(या दिवसापासूनच आवळे चिंचा खायला सुरुवात करावी असा जणू संकेतच असावा). संध्याकाळी तांदळाचा बारीक खसखशीत रवा जात्यावर दळून घ्यायचा .त्याचा वापर रांगोळी काढण्यासाठी व्हायचा .ही रांगोळी एका विशिष्ट प्रकारानेच घालायची .म्हणजेच चंद्राची अर्धी कोर असते ना तशीच तर्जनीवर थोडी थोडी ही रांगोळी घ्यायची व अलगद अंगठ्याने पुढे सरकवायची .सुंदर अशा कित्येक चंद्रकोरी तुळशी वृंदावना भोवती जणू फेर धरूनच नाचत आहेत असे वाटायचे. यालाच कणा  मोडणे असे म्हणायचें .रंगीत रांगोळी व्हावी म्हणून पिंजर व हळद मिसळून लाल ,पिवळे रंग तयार करायचे. पणत्यांच्या  उजेडात भटजी( पुरोहित) येऊन अंतर पार धरून प्रत्येक घरोघरी तुळशीचे लग्न लावायचे. लग्नात वाटले जायचे चुरमुरे. मध्येच एखादा उसाचा छोटा छोटा तुकडा असायचा  वृंदावनात ऊसाचे वाढ रोवले जायचे. दिंड्याची साल विशिष्ट तऱ्हेने कोरून त्यावर छान नक्षी केलेला दिंडा हा करवला.(धेडा )तर बांबूची काठी करवली (धेडी ). तुळस नवरी तर त्या घरातील मुलगा नवरा म्हणून माळ घेवून उभा राहायचा. वाडीत एकाच दिवशी सगळीकडे लग्न लावीत भटजी...

त्याच्यामागून आम्ही मुले मोठी पिशवी घेऊन ,अशी वरातच जायची जणू!! चिरमुले जमवण्यासाठी. निदान आपल्या आवाजापर्यंत तरी जायचंच . परत आपापल्या घरी येताना कोणाच्या पिशव्या चुरमुऱ्याने किती भरल्या हे दाखवतच यायचं . पुढे कित्येक दिवस ते आमचं पौष्टिक खाणं असायचं. दुसऱ्या दिवशी पहाटेच आई उठून आदल्या रात्री घातलेली रांगोळी धुवून काढून पुन्हा शेण काढायची. यावेळी असं सांगितलं जायचं की या रांगोळीवर म्हणे घरच्या पुरुषांची नजर दुसऱ्या दिवशी पडू नये .पण याचे कारण आम्हाला अजूनही कळलेले नाही. हा ...असे हे आमचे दिवाळीचे दिवस तुळशी विवाह पर्यंतचे. मजे मजेचे. हवे हवेसे वाटणारे..

आत्ता काळ बदलला ,काळाप्रमाणे आम्ही ही लोक दृष्टीने बदललो, पण पूर्वीचा जिवंत ओलावा कमी झाला हे जाणवू लागलं... सिमेंट काँक्रीटच्या घरांमुळे पूर्वीच्या कौलारू घरातून पडणारे सूर्यकिरणांचे झरोके, चुलीतून येणारा धूर ,माणसा माणसातील आपुलकी हे सगळं पडद्याआड होतंय .याची खंत मनाला जाणवते .आज दिवाळीला अनेक प्रकारचा फराळ बनवला जातो ;पण त्या पोह्यांची चव या पदार्थांना नाही असं वाटतं .आज दिवाळीसाठी भरपूर खरेदी' शॉपिंग होतं ;पण मायेने दिलेला वापरलेला फ्रॉक नव्याने घालतानाचा आनंद या शॉपिंग पुढे ठेंगणाच . माळ्यावर जपून ठेवलेला कंदीलाचा सांगाडा आठवला की आजचे झकपकीत कंदील निस्तेज वाटू लागतात. लाइटिंग करून झगझगाट केला जातो ;पण तेलाचे दिवे त्यांचा उजेड, त्यातून निघालेला सुवास, त्यातला सात्विकपणा हे सारं हरवलं . कालाय तस्मैय नमः! असं जरी म्हटलं तरी स्वतः बनवलेले ग्रीटिंग जेव्हा पोस्टाने यायची तो दिवस आणि आताच्या मोबाईल वरचा फॉरवर्ड केलेल्या शुभेच्छा, यात मी माझी बालपणची दिवाळी शोधत बसते. तेलकट, तुपकट लाडू, करंज्या, शंकरपाळया, अनारसे बघताना कांडलेले पोहे ,त्यांचा सुवास ,त्यांची पौष्टिकता हे सारे आठवून मन गहिवरून येतं.
दिन दिन दिवाळी गाई म्हशी ओवाळी या ओळी तर अनुभवता येणं शक्यच नाही..

माझ्या बालपणी दिवाळीत अनेक प्रकारचा अभाव होता; पण आता अनेक सोयी सुविधा , झकमगाट असला , खाण्या पिण्यातली रेलचेल असली, तरी प्रभावातल्या या दिवाळीत अभावच जाणवतो....



**ग्रामीण भागात दिवाळी पाडव्याला शेणाचा गोठा तयार करतात. कारीट या फळांपासून गायी बैल करतात.**

# दिवाळी आणि परंपरा



वासवदत्ता अग्निहोत्री.
ग्वाल्हेर (म.प्र) 9425462163

युगपुरुष श्रीरामाच्या लंका विजय मिळवून अयोध्येत परतीचा प्रतीक म्हणून हा सोहोळा आयोजित करण्यात आला. आजपासून अनेक वर्षांपूर्वी या दिवाळी ची परंपरा कायम आहे. दरवर्षी भारतात सर्वात मोठ्या प्रमाणात हा सण थाटामाटात साजरा करतात. स्वच्छता, साजसज्जा ,रोषणाई, पक्वान्न, नवीन वस्त्र परिधान करणे म्हणजेच दिवाळी. फटाके फोडून धूमधडाक्यात लक्ष्मीपूजन करतात आणि त्यानंतर बरेच लोक पत्ते सुद्धा खेळतात ही एक परंपरा आहे. आजतागायत ही सण साजरा करण्याची परंपरा कायम आहे.हे संस्कार लहानपणापासून आपल्यावर पडत आले आहेत त्यामुळे आपोआपच आपण सणाच्या आगमनाची चाहूल लागताच, सवयीनुसार कामं करतो.काही विशेष तिथीनुसार ,देवांच्या दर्शनास ही खूप गर्दी होते. एक लहानशी घटना इथे सांगाविशी वाटते, शरद पौर्णिमेनिमित्त आम्ही बरेच लोक मिळून केदारनाथाच्या दर्शनास गेलो होतो. तिथे अनेक परदेशी लोक पर्यटक सुद्धा आले होते. एक जर्मन स्त्री माझ्यासोबत बोलू लागली. जी थोडीफार धार्मिक माहिती तिला होती त्यालाच ती मला सांगून आणखीन काही मला सांग असे म्हणत होती. तिथे बरीच गर्दी होती. ती इतक्या लोकांना बघून विचारत होती..."ह्या सर्वांना एकत्र इथे कोणी बोलावले??"(Who invite all these people here?) मला हसू आले. मी तिला सांगितले की इथे येण्यास कुणाचेच 'इन्व्हीटेशन ' लागत नाही. शरद पौर्णिमेचा हा अद्भुत चंद्र बघण्यास लोक आतुर असतात आणि म्हणूनच आपणहून इथे येतात. असेच पवित्र नद्यांमधून स्नान करण्यास अशीच किंबहुना ह्याही पेक्षा खूप जास्त गर्दी होत असते. तेव्हा ही धार्मिक तिथीनुसार, स्थानाचे खूप महत्व असते, तेव्हादेखील कुणीच कोणाला बोलवत नाहीत. तर हे आपले धार्मिक संस्कार आहेत. तसेच दिवाळी सारखा मोठा सण ही अनेक ठिकाणी परंपरेनुसारच साजरा करतात.

मालवा आणि व्रज इथे होळी दिवाळी खूप आधीपासून सुरू होतात. सर्व धर्म हा सण साजरा करतात. आमच्या समोर बागेत नियमित फिरायला येणारी मुसलमान म्हातारी, सर्वांसोबत "राम राम "करते आणि दरवर्षी दिवाळी खूप थाटामाटात साजरी करते. सिंधी, पंजाबी, वाणी सर्व जण उत्साहात असतात.भारतात कितीक मतभेद असले तरीदेखील सर्वधर्मसमभाव आहे असे मला वाटते.

धार्मिक भेदभाव जास्त काळ टिकत नाहीत जर त्यांचे निखारे, काही विशिष्ट लोकांच्या भावनांनी फुलवले नाहीत तर..!!

ग्वाल्हेर ला सिंधिया राजवंशात दिवाळी खूप सुंदर साजरी करण्यात येते.

ग्वाल्हेर च्या गोरखी परिसरात त्यांचे देवघर आहे. तसा तिथे रोजच पूजापाठ,आराधना, सात्विक नैवेद्य (दोन्ही वेळ) असतो. तिथे पुजारी आणि इतर सेवकवर्ग नेमलेला आहे पण प्रत्येक सणाला, इथला राजा (पहिले कै. माधवराव सिंधिया नंतर त्यांचे चिरंजीव सिंधिया)आपल्या पारंपरिक वेषात, सहकुटुंब,वाजतगाजत येऊन पूजापाठ करतो. तो देखावा बघण्यासारखा असतो. मुहूर्तावर लक्ष्मीपूजन झाल्यानंतर शकुनाचे दोन फटाके फोडून धूमधडाक्यात परत जातात. ही परंपरा आजतागायत टिकवून ठेवली आहे.

इथे ग्रामीण भागातील दिवाळीत, 'गुजिया पपडिया, बेसन बर्फी, लड्डु ' हे पारंपरिक व्यंजन तयार करतात. लक्ष्मीपूजन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी पाडवा 'पडवा ' 'दौज ' आणि मग 'गोवर्धन पूजा ' खेडेगावात आणि शहरातील रांगडे लोक 'गोबरधन 'म्हणजेच घराबाहेर ओट्यावर शेणाचा लहानसा गोवर्धन पर्वत तयार करतात, त्यात ऐपतीनुसार चांदीचे नाणे लपवतात आणि पूजेनंतर  घरातील पुरुष त्यात हात घालून भराभर ते नाणं शोधतात. ज्याला सापडेल त्याचे नाणे. असे गमतीशीर खेळ खेळतात.पूजेनंतर तो गोवर्धन तसाच घराबाहेर एखाद्या कोपऱ्यात ठेवतात नंतर सरपण म्हणून कामी येतो. रीतीरिवाज खूप असतात. ग्रामीण भागातील प्रत्येक खेडेगावात निराळे लोकाचार, भिन्न पद्धत आणि वेगळे संस्कार असतात पण तरीदेखील आपण कोणालाच हे बरोबर नाही किंवा ही पद्धत बदलायलाच हवी असे म्हणू शकत नाही.जसा प्रत्येकाला आपला धर्म प्रिय असतो तसेच जीवनशैली, रीतीरिवाज, लोकाचार रहाणीमान हे प्रिय असते. दिवाळीत उडवल्या जाणारे फटाके हे मात्र बंद व्हावे असे मला आवर्जून वाटते. ज्या मानाने भारताच्या लोकसंख्येत वाढ झाली आहे त्याच पटीने वहातूकीचे प्रमाण ही वाढले आहे. वहातूक म्हटले की प्रदूषण आलेच आणि प्रदूषण आता इतके जबर वाढले आहे की अनेक शहरातून सम विषम नंबर ची वाहने एकादिवसा आड चालवायची परवानगी आहे.कार च्या जुन्या मॉडेल्स निषिद्ध आहेत. खूप प्रयत्न करून देखील अतिशय प्रदूषण वाढले आहे.हरियाणा चे शेतकरी 'पराली ' म्हणजेच पीक कापणी झाल्यानंतर जे शेतात उरते ते वाळलेले मुळं, ते ह्याच दिवसात जाळतात कारण ते जमिनीतून निघाल्यावरच दुसऱ्या पिकासाठी शेत तयार करू शकतात. पराली जाळाल्याने आणिकच प्रदूषण होते आणि दिवाळीच्या सुमारास महानगर दिल्ली येथील ए.क्यू. आय. म्हणजेच एयर क्वालिटी इंडेक्स 364 पर्यंत जातो. मोकळा श्वास देखील अतिशय दुर्मिळ होतो. फुफ्फुसाचे आजार उद्भवतात आणि खोकून खोकून सगळे हवालदिल होतात. त्यात सण म्हणून फटाके उडवतात. त्याचा धूर सगळीकडेच पसरतो आणि प्रदूषणाचे प्रमाण वाढत जाते.

दिल्लीत खूप हिरवळ आहे पण ती तरी बिचारी काय करणार. वयोवृद्ध लोक आणि लहान मुलांना दिवाळीनंतर खूप त्रास होतो.
फटाक्यांचा आवाज ही खूप घातक असतो. ज्यांना तीव्र स्वराची सवय नसेल त्यांना कान गच्च दाबून देखील त्रास होतो. ह्या आवाजाने पशु पक्षी घाबरतात. गल्लीतले कुत्रे, पाळीव प्राणी खूप दचकतात. तान्ही अर्भक भयंकर दचकतात. दुसरी महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे, फटाके उडवणे हा प्रकार, शुद्ध पैसे जाळण्याचा आहे. पैसे खर्च करून महागडे फटाके आणायचे आणि आग लावून क्षणार्धात उडवून टाकायचे म्हणजे खूपच वेडेपणा आहे. शकुनाचे दोन फटाके फोडून, आनंदात दिवाळी साजरी करता येणार नाही काय?फक्त फटाके म्हणजेच दिवाळी नव्हे.

हा सण आनंदाचा आहे. प्रत्येक सण आपल्या दैनंदिन जीवनात नाविन्य आणतो, उत्साह निर्माण करतो. भारतात इतके सण आहेत ज्याचा मूळ अर्थ आनंद निर्माण करणे आहे. तोच जर मिळत असेल तर आयुष्यभर प्रत्येक दिवस सणाचा होऊ शकेल. ह्या नश्वर जीवनात जिथे कुठे मिळेल तिथून आनंदाचे क्षण टिपले तर जगणं किती उत्तम होईल नाही काय..?

## दिवाळी सण साक्षात प्रबोधनाचा कुंभ...





**शब्दांकन - सायली राजन सामंत.**
**नेरुर कुडाळ, बी. ए. एल. बी स्टुडन्ट**

दीपो  नाशयते ध्वांतं धनारोग्ये प्रयच्छति,
कल्याणाय भवति एव दीपज्योती नमोस्तुते ||

तिमिराकडून तेजाकडे नेणाऱ्या आणि आपल्या सर्वांच्या आयुष्याला तेजोमय बनवणाऱ्या तसेच आरोग्य तथा धन प्राप्तीकडे मार्गक्रमण करण्याची आस देणाऱ्या अशा तेजोमय दिव्याला माझा शतशः प्रणाम.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि साधू संत महंतांच्या पदस्पर्शने पुनीत झालेल्या आपल्या महाराष्ट्राला विविध सणांची परंपरा लाभली आहे.विजयादशमीच सोनं लुटल्या नंतर सर्वांना दिवाळी सणाचे वेध लागतात.दिवाळी सण आणि दिव्यांच नातं अनादी काळापासून चालत आलेलं आहे.मित्रांनो दीपावली या शब्दाची मूळ उत्पती ही हिंदू धर्मातील आद्य भाषा म्हणजेच संस्कृत मधील दोन शब्दांच्या उच्चाराने झालेली आहे.दीप म्हणजे दिवा आणि आवली म्हणजे ओळ. याचा संपूर्ण अर्थ पाहिला तर दिव्यांची एका ओळीत केलेली रंजक रचनेची रांग म्हणजेच आपल्या सर्वांना हवी हवीशी वाटणारी दिवाळी अर्थात दीपोत्सव.

रामायण युगात चौदा वर्षांच्या कालखंडात लंकाधीश रावणावर विजय प्राप्त करून जेव्हा प्रभू रामचंद्र आपली भार्या सीतामाई आणि प्राणप्रिय बंधू लक्ष्मण आणि सखा हनुमंत तसेच बलाढ्य वानरसेनेसहीत जेव्हा अयोध्येत पुन्हा आले तेव्हा साऱ्या प्रजेने अयोध्येत दीपोत्सव साजरा केला.याचे लिखित पुरावे पोथीपुराणात आजही सापडतात.सध्याच्या घडीला दीपोत्सव घरा घरात साजरा केला जातो. पण रामाचे आचार,विचार, संस्कार, कर्तृत्व, दातृत्व, नेतृत्व, सदाचार, सत्कर्म, संस्कारसंपन्नता याचा मात्र प्रकर्षाने समाजात अभाव दिसतो. मानवतेचा उद्धार व्हावा असं जर प्रत्येकाला वाटत असेल तर त्रिकालज्ञानी रामाच्या सद्गुणांना प्रत्येकाने अंगीकारलं पाहिजे तरचं दीपोत्सवातील लक्ष दिव्यांच्या ज्योतींप्रमाणे प्रत्येकाचं जीवन सुखकर आणि तेजोमय होईल. फक्त प्रत्येक माणसाने आचरणाच्या दिव्यात सदाचाराच सतत तेल घालत रहाणं गरजेचं आहे. दीपोत्सव प्रत्येक माणसाला नेमक हेच सांगत असतो.

चला आकाशदिवा लावुनी मानवतेचा... रेखाटूया कशीदा धर्मनिरपेक्षतेची सुबक आणि सुंदर रांगोळी चला सुसंकृतपणाच्या पेटवूयात पणत्या प्रेम आपुलकीची प्रत्येकाच्या हृदयी साजरी करूयात दिवाळी...

जगाच्या पोशिंद्या बळीराजाच्या दुधदुभत्यासाठी होणारा गाईचा उपयोग आणि शेतीच्या कामी बैलाची होणारी मदत ह्या गोष्टी लक्षात घेऊन त्या गोधनाची केलेली कृतज्ञतापूर्वक पूजा म्हणजेच वसुबारस. हिंदु धर्मामध्ये गाय असो किंवा बैल असो यांना पवित्र आणि पूज्य स्थान आहे. पण अलीकडच्या काळात हिंदुधर्मात प्राणप्रिय अशा मानल्या जाणाऱ्या या निष्पाप जनावरांची काही क्रूरकर्मी घटकांकडून सर्रास कत्तल केली जाते. असं नीच कृत्य करणाऱ्यांविरुद्ध आवाज उठवण्याची शपथ दीपावली सणातील तेजोमय दिव्याला साक्ष ठेऊन समाजातील प्रत्येक घटकाने घ्यावी तरच वसूबारशीच्या

पूजेचं व्रत सार्थकी लागल्याचं पुण्य तुमच्या पदरी पडेल हे मात्र निश्चित. याच दिवशी एक दिवा प्रज्वलीत करून तो दिवा दक्षिण दिशेला यमदेवतेसाठी लावला जातो कारण यमदेवतेला दक्षिण दिशेचा अधिपती म्हणून गणलं गेलं आहे. दिवाळीतील नरकचतुर्दशी हा पहिला दिवस.यादिवशीच्या मध्यरात्रीला नरकासुराला अग्नी देऊन दहन केले जाते. तसेच यादिवशी पहाटे उठून सुगंधी उटणे लावून अभ्यंगस्नान केले जाते. ही परंपरा वर्षानुवर्षं चालत आली आहे.

मित्रांनो सध्याच्या घडीला शासनाची लाडकी बहीण योजना घराघरात पोहोचलेली दिसते पण खरं सांगायचं झालं तर सध्याच्या घडीला घरा घरातील लाडकी बहीण मात्र मुळीच सुरक्षित नाही. त्यामुळेच तर गल्लोगल्लीत समाजातील विकृत क्रूरकर्मी नरकासुरांकडून स्त्रियांवरती वारंवार अत्याचार होताना दिसतात. समाजातील या विकृत क्रूरकर्मी नरकासुरांना अद्दल घडवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने तसेच विविध पक्षाच्या लोकप्रतिनिधिंनी जशास तसं उत्तर देण्यासाठी संघटित होणं गरजेचं आहे. त्यासाठी कायद्यात कृष्णनितीचा अंमल आणावा लागेल. मग पहा स्त्रीकडे वाकड्या नजरेने पहाण्याची हिंमत कधीच कोणाची होणार नाही. वर्षानुवर्ष चालत आलेल्या प्रथेप्रमाणे या दिवशी ज्या गावात आपण रहातो त्या गावातील ग्रामदेवतेचं स्तवन करून घरासमोरील अंगणातील तुळशी वृंदावना समोर कारिटं फोडून गोविंदा गोविंदा असा मुखाने नामघोष करत त्यातील कडू रस चाखून त्यानंतर कुटुंबातील सर्व सदस्य एकत्रित येऊन गोडधोड फराळाचा आस्वाद घेताना प्रेम आपुलकी जिव्हाळयाचं बंधन निभावतात.दिवाळी सणातील ही वर्षानुवर्षे चालत आलेली प्रथा आहे. आजही ती घरोघरी जपली जाते हे मात्र विशेष. या दिवसाच महत्व पटवून देणारी महत्वपूर्ण रहस्यमय कथा म्हणजे मित्रांनो यादिवशी श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासुराचा वध करून त्याच्या बंदिशाळेतील सोळा सहस्त्र शंभर कन्यांची मुक्तता केली.तो हा दिवस. दृष्टांचा नाश आणि मुक्तीचा आनंद याचे प्रतीक म्हणून या दिवसाला फार महत्व आहे.लक्ष्मी पूजना दिवशी प्रत्येकजण घरोघरी तसेच व्यापारी बांधव आपल्या उद्योगधंद्याच्या ठिकाणी मोठ्या भक्ती भावाने आणि श्रद्धेने माता लक्ष्मीचे पूजन करतात. लक्ष्मी आपुल्या घरात यावी म्हणूनी सारे तिलाच पुजिती. पूजनासाठी फळे गोडधोड,फुले सुगंधाची. या पूजेचा थाट अलौकिक आणि अविस्मरणीय असाच असतो. पण सध्याच्या घडीला लक्ष्मीपूजना बरोबरच सरस्वती मातेचंसुद्धा पूजन करणं काळाची गरज आहे कारण ज्याच्या भाषेत सरस्वतीचा वास असेल त्या व्यक्तीच्या घरात निश्चितच लक्ष्मी वास्तव्यास राहील.मग पहा अवदसा पाठीला पाय लावून कायमची पळून जाईल.आणि नारायणाच्या कृपेने सुखं समृद्धी आरोग्याच्या रूपात खऱ्या अर्थाने तुमचा संसार बहरात येईल. आणि त्यानंतर संसाररुपी सौख्य पहाण्याचे भाग्य तुम्हाला खऱ्या अर्थाने प्राप्त होईल.हा वास्तव सत्य आणि सत्य आहे.

पाडवा म्हणजे दीपावली सणातील मंगलमय दिवसांपैकी एक दिवस. हा पाडवा पती पत्नीच्या अतूट प्रेमाचं प्रतीक दर्शवतो. या दिवशी पत्नी पतीला औक्षण करते. व पती पत्नीला ओवाळणी घालतो.

नवविवाहित दामपत्याची पहिली दिवाळी ही पत्नीच्या माहेरी साजरी करतात.या दिवशी नवीन कपडे, दागिने, गाडी तसेच विविध वस्तू सर्रास विकत घेतल्या जातात कारण खरेदीसाठी हा शुभदिवस मानला जातो. हा पाडवा स्वतःच्या घरी किंवा पत्नीच्या माहेरी तुम्ही कुठेही साजरा करा पण औक्षणाच्या तबकडीतील त्या तेजोमय दिव्याला साक्ष ठेऊन प्रत्येक पतीपत्नीने आपण संसाररुपी रंगमंचावर कार्यरत असताना भविष्यकाळात आम्हा दोघांमध्ये संवाद साधण्याची वृत्ती संचारावी अशी परमेश्वराकडे हात जोडून प्रार्थना करावी.कारण संवादामुळे पतीपत्नीमध्ये नकळत वाद झाला तर तो वाद विकोपाला न जाता क्षणार्धात मिटतो आणि प्रेम,आपुलकी, जिव्हाळयाचं बंधन निभावण्याची वृत्ती पती पत्नी या उभयतांमध्ये संचारते. आणि त्यामुळेच संसाररुपी नाटकाची खऱ्या अर्थाने गोल्डन जुब्ली होते. दिवाळी पाडवा हा पतीपत्नी उभयतांनी त्यासाठीच साजरा करायचा असतो.हे निदर्शनास आणून देणे क्रमप्राप्त आहे.उत्तर भारतात या दिवशी गोवर्धन पूजा केली जाते.ही पूजा श्रीकृष्णाच्या किंवा विष्णुच्या मंदिरात केली जाते.या पूजेला अन्नकूट असेही म्हणतात. बलिप्रतिपदा. पौराणिक युगात बळीराजा हा शेतकरी राजा होऊन गेला.हा बळीराजा जनहिताची नेहमीच काळजी घेत होता. त्याकाळात धनधान्याने कोठारे भरलेली असायची.पण दुर्दैव म्हणावे लागेल कारण सध्याच्या लोकशाहीच्या कालखंडात शेतात राबून धनधान्याचा पुरवठा करणारा माझा हा शेतकरी बळीराजा अनेक समस्यांच्या चक्रव्यूवात पुरता फसला आहे. माणसाने केलेल्या अतिक्रमणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल हा ढळला आहे. अवकाळी पाऊस,ढगफुटी, वादळी वारे, धरणी कंप, दूषित हवा, अपुरा पाण्याचा पुरवठा,अशा विविध नैसर्गिक आपत्यांना सध्याच्या घडीला शेतकरी बळीराजाला प्रतिवर्षी सामोर जावं लागत आहे. या सर्व नैसर्गिक समस्यांना सामोरं जाता जाता या शेतकरी बळीराजाचा जीव मात्र अगदी मेताकुटीला आला आहे. येवढंच नव्हे तर शेतकऱ्याने शेतात पिकवलेल्या मालाला बाजारात सध्याच्या घडीला पुरेसा भावही मिळत नाही. सरकारी योजनांच्या गाजराची पुंगी सध्याच्या घडीच्या राज्यकर्त्यांकडून नेहमीच वाजवली जाते. पण त्या योजनांच्या आर्थिक लाभापासून हा बळीराजा मात्र नेहमीच वंचित रहातो. पुराण युगातील शेतकरी बळीराजा मात्र खऱ्या अर्थाने सौख्य उपभोगत होता.कारण त्याकाळचे राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी सक्षम होते.तो पुराणयुगातील बळीराजाने अनुभवलेला सौख्याचा काळ पुन्हा यावा असं जर प्रत्येकाला वाटत असेल तर सध्याच्या राज्यकर्त्यांनी बळीराजाचे आर्थिकदृष्ट्या तारणहार बनणं खऱ्या अर्थाने गरजेचं आहे.

तशी मती सध्याच्या राज्यकर्त्यांना परमेश्वराने द्यावी अशी प्रार्थना प्रत्येकाने बालिप्रतिपदेच्या दिवशी करण गरजेचं आहे. तरच बलिप्रतिपदेच्या पूजेच पुण्य प्रत्येकाच्या वाट्याला येईल.


हे मात्र निश्चित.भाऊबीज ही भावा बहिणीच्या अतूट नात्याचं प्रतीक दर्शवते. हिंदु धर्माच्या राठीत द्रौपदी स्वयंवराच्यावेळी कृष्णाने आपली बहीण द्रौपदीला साड्या पुरवल्याचा वास्तव सगळयांनाच माहिती आहे. ती प्रासांगिकता मात्र सध्याच्या कलियुगात हवेत विरून गेलेली दिसते. अहो त्यामुळेचं तर वडिलोपार्जित संपतीच्या विभाजनावरून बहीणभावांमध्ये घरा घरात तंटे विकोपाला गेलेले दिसतात. सध्याच्या घडीला भावाची परिस्थिती गरीब असेल आणि बहिणीची घरची परिस्थिती श्रीमंत असेल तर प्रसंगाचं गांभीर्य जाणून बहिणीने भावाला आर्थिक मदत करण्याचे सत्कर्म कराव किंवा भावाची आर्थिक परिस्थिती श्रीमंत असेल आणि बहिणीची आर्थिक परिस्थिती हालाखीची असेल तर भावाने बहिणीला आर्थिक मदत करण्याचे सत्कर्म करावे , बहीण असो किंवा भाऊ असो दोघांचीही परिस्थिती सदन असेल तर दोघांनीही सुवर्णमध्य साधून वडिलोपार्जित संपत्ती विभागून घ्यावी.तरच बहीण भावाच नातं सध्याच्या घडीला खऱ्या अर्थाने तंटामुक्त होईल. हे सत्य नाकारून चालणार नाही. भाऊबीज साजरी करण्याचा नेमका हाच तर हेतू आहे. याचे लिखित पुरावे आजही पोथी पुराणात सापडतात भाऊबीजेची प्रथा आगळी,भावा बहिणींनी ती जपून ठेवावी अशा प्रथेमुळे शान वाढते हिंदू धर्माची. दिवाळी सणाची सांगता होते ती तुळशी विवाह सोहळयाने.मग धांदल तुळशी लग्नाची, जमुनी सारे तीला सजवती, विधिपूर्वक विवाह लावती विष्णुदेवाशी.हिंदू धर्मात मंदिराच्या कळसाला आणि अंगणातील तुळशीला पवित्र मानलं जात.संतयुगात या अंगणातील तुळशी वृंदावनाला घालून पाणी पंढरपूरात गेली होती जनी.अशा आख्यायिकेचं कीर्तनकार, प्रवचनकार निरूपण करताना दिसतात. विष्णू पुराणातील वृंदा जलधर हा कथासार प्रत्येकाच्या वाचनात आला असेल.विष्णुभक्त वृंदा ही पतीव्रता होती. तिच्या विष्णुभक्तीमुळे तिचा पती अत्याचारी जलंधर याला पराभूत करणे देवांनाही अशक्यप्रिय होऊन गेले होते. त्यावेळी भगवान विष्णुने संधी साधून प्रत्यक्ष जलधराचे रूप धारण करून वृंदेच पातीव्रत्य भ्रष्ट केले. त्यामुळेचं जलधराला संपवण देवांना शक्य झाले. पण ही वार्ता वृंदेला समजताच.वृंदेने विष्णुला तुला पत्नी विरहाचा आघात सोसावा लागेल असा शाप दिला.त्यामुळेच विष्णुची राम अवतारात लंकाधीश रावणाने पत्नी सीता हिचे हरण केल्यामुळे विष्णूरूपातील रामाला पत्नीच्या विरहाचा आघात सहन करावा लागला. तसेच वृंदेच्या शापामुळे विष्णूचा साक्षात दगड झाला.त्या दगडालाच शाळीग्राम असे म्हणतात. त्या शापातून मुक्त होण्यासाठी भगवान विष्णुना खडतर प्रसंगांना सामोरे जावे लागले.त्यानंतर भगवान विष्णुना शापातून मुक्ती प्राप्त झाली. ते मूळ रूपात स्थिर झाले.

जलधराचे शीर आपल्या मांडीवर घेऊन वृंदेने अग्नित प्रवेश केला. ती जळून खाक झाली. त्यानंतर वृंदा आणि जलधराला त्यांच्या मूळ रूपात मुक्ती प्राप्त झाली.

सागर पुत्र जलधर हा पूर्वजन्मीचा विष्णुचा अवतार आणि वृंदा ही लक्ष्मीचा अवतार.ती वृंदा म्हणजेच लक्ष्मी.या कलियुगात तुळशीच्या रूपात प्रत्येकाच्या अंगणात बहरलेली दिसते.आणि जलधर म्हणजेच विष्णूचा अवतार.अहो म्हणूनच तर तुळशी विवाहाच्या दिवशी दिंड्याचा गोविंदा म्हणजेच नवरा बनवून त्या नवऱ्याचा तुळशी सोबत विधीपूर्वक विवाह लावला जातो आणि याचं तुळशीविवाह सोहळया बरोबर दीपावली सणाची सांगता होते.

या संपूर्ण दिवाळी सणाच्या पवित्र अशा संकल्पनेत तुम्ही आम्ही सर्वजण एकरूप होऊयात.आनंद स्वतः घेऊया आनंद इतरांना देऊया.आनंद साजरा करण्याचा हक्क प्रत्येकाला आहे.पण तो आनंद साजरा करताना मात्र माणुसकीचा धर्म प्रत्येकाने पाळला पाहिजे.मित्रहो परिस्थिती समाजातील प्रत्येक घटकाला हतबल करत असते.ते प्रत्येकाचं पूर्वसंचित असतं. त्यामुळेच त्या परिस्थितीला प्रत्येकाला सामोरं जाव लागतं.हे त्रिवार सत्य आहे. म्हणूनच तर मी हात जोडून तुम्हाला नम्र विनंती करते की या वर्षीच्या दिवाळीला लागणारे दिवे म्हणजेच पणत्या, विविध रंगांची रांगोळी, दिवाळी सणाचा गोडवा वाढवणारा रुचकर फराळ, आकाशकंदील,सुगंधी उटणे,सजावटीच साहित्य अशा विविध वस्तू मोठ मोठ्या मॉल मध्ये जाऊन तुम्ही विकत न घेता गोरगरीब आर्थिकदृष्ट्या गरजू व्यापाऱ्यांकडून त्या सर्व वस्तू विकत घ्या. कारण तुम्ही विकत घेतलेल्या वस्तूंमुळे त्या गरीब व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद फुलकीत होईल.कारण ते आर्थिकदृष्ट्या गरजू असलेले व्यापारी श्रीमंत होण्यासाठी नाही हो कमवत, तर ते दोन वेळेचं अन्न मिळावं म्हणून कमवत असतात.तुम्ही विकत घेतलेल्या वस्तूंमुळे त्या गरीब व्यापाऱ्यांना दोन वेळचं अन्न पोटभर जेवता येईल आणि या दिवाळीला अन्नदान केल्याच्या पुण्याच सौख्य परमेश्वर व्याजासकट तुमच्या घरी पाठवून देईल.कारण हिंदुधर्मात अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानलं गेलं आहे.तेचं पवित्र अन्नदान तुमच्याकडून केल गेलं तरचं संपूर्ण दिवाळी सणाचा संकल्प सिद्धिस गेला अस तुम्हा आम्हाला म्हणता येईल. मित्रहो तुम्हा सर्वांना माझ्याकडून व माझ्या परिवाराकडून दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

# लग्नापूर्वीची दिवाळी



प्रकाश तांबे
8600478883

माझ्यासाठी लग्नापूर्वीच्या दिवाळीचा काळ म्हणजे, घरच्या आठवणा-या दिवाळीच्या काही प्रसंगांपासून (वय वर्षे ५-६) लग्नात मुंडावळया बांधून उभा ठाकण्यापर्यंतचा (वय वर्षे २७) सुमारे दोन तपांचा काळ. दिवाळीची चाहूल लागली की घराची स्वच्छता, फराळाचे पदार्थ, फटाके आणि किल्ल्याचे वेध लागायचे. शाळांना सुट्टी लागलेली असायची त्यामुळे "बालकामगार" कायदा धाब्यावर बसवून आम्हाला आमच्या वजन, उंचीला साजेशी हलवा हलवीची वा पुसा पुशीची कामे मिळायची. सांघीक स्वच्छता मोहीमेत आमचा खारीचा वाटा नक्की असायचाच.

दिवाळीचा "फराळ" म्हणजे रोजचे जेवण नसलेला आहार! माझ्यासारख्या ज्येष्ठांना ह्या फराळाची आठवण थेट बालपणात नेऊन पोचवते. माझ्या लहानपणी म्हणजे सुमारे साठ सत्तर वर्षांपूर्वी फराळाचे लाडू, करंजी, अनारसे, चिरोटे, शेव, चिवडा, चकली, कडबोळी वगैरे पदार्थ घरीच बनवायची पध्दत होती. घरगुती चवीचे दुकानात विकत मिळणारे पदार्थ आमचे आई वडील आणत नसत. यातील चकली, कडबोळी आणि बेसनच्या लाडवांना गणपती विसर्जनात लायटींगच्या गणपतींना असते तसे महत्व असायचे. ह्या तिघांची भट्टी जमली की बाकी शेव, चिवडा, चिरोटे हे वारकरी सांप्रदायातील इतर मानकरी शिस्तीत जमायचे. कोणत्या दिवशी कोणते पदार्थ करावयाचे याचे "वेळापत्रक" माझी आई आणि चाळीतल्या तिच्या मैत्रीणी ठरवायच्या. या कार्यक्रमात आम्हाला चव घेण्यासाठीही प्रवेश नसे कारण भरल्या ताटाचा देवाला नैवेद्य आणि मगच स्वाहा हा शिरस्ता काटेकोरपणे पाळला जाई. नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजनाला फराळ ज्याच्या त्याच्या घरीच असायचा. चाळीतले इतर तसेच नातेवाईक व मित्रमंडळी त्या नंतर एकमेकांच्या घरी जायचे.

मला स्पष्ट आठवते की साधारण १४-१५ वयापर्यंत आमचा कल्याणचा मामा खास आमच्यासाठी फटाके घेऊन यायचा. लवंगी, डांबरी फटाक्यांच्या माळा, लहान मोठ्या रंगीत व साध्या फुलबाज्या, नागगोळी, सुदर्शन चक्र, भुईचक्र आणि लक्ष्मी छाप ८-१० ॲटम बॉंब! किल्ल्यासाठी दरवर्षी नवनवीन संकल्पना असायच्या. मोहरीचे दाणे, गहू पेरून जंगल निर्माण करणे व त्यात काही मावळे उभे करणे आणि शिवाजीच्या काळातही रेल्वे, इलेक्ट्रीकचे खांब या गोष्टी आम्हाला अटळ वाटायच्या.

आम्ही चाळीतली मुलं किल्ल्यासाठी तिकीट विक्री करायचो. या या या येथे प्रेक्षणीय किल्ला आहे. किंमत २५ नवे पैसे!!!
खूप धमाल असायची दिवाळीत, फुल टाईम पास! फुल टू धमाल वगैरे!!

# लग्नानंतरची दिवाळी

लग्नानंतरची पहिली दिवाळी म्हणजेच दिवाळसण हा खरोखरीच संस्मरणीय होता. लग्नाआधीचा बाळ्या थेट प्रकाशराव झाला होता. दिवाळसणासाठी अस्मादिकांना आग्रहाचे बोलावणे होते. सह्याद्री किंवा महालक्ष्मीने मी पहिल्या दिवाळसणासाठी जातोय ही खबर माझ्या काही नाठाळ मित्रांना लागताच त्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला; २१ बैलगाड्या स्वागतासाठी सासुरवाडीला सज्ज आहेत वगैर वावड्या सोडू लागले....
जावई येणार म्हणून सासू, सासरे आणि सासरच्या सर्वच मंडळींना कोण आनंद झाला होता. त्यांच्या घरी संपन्न होणारा हा पहिलाच दिवाळसण होता ना! "दिवाळसणासाठी पूर्वतयारी" या सबबीवर ४-८ दिवस आधीच गेलेल्या सौ ने माझ्या बोटाचं माप नेले होते तेंव्हाच पेपर फुटला होता; अंगठी मिळणार हे निश्चित झाले होते आणि पाडव्याच्या शुभदिनी श्वशुरांनी सोन्याची अंगठी माझ्या बोटात अलगद सरकवली. सहा महिन्यांपूर्वी जूनमधे आपल्या मुलीचे हात माझ्या हातात देऊन माझे हात ज्यांनी मजबूत केले होते त्यांनी आज त्याच हाताच्या बोटावर सोन्याची अंगठी सरकवली! देण्या घेण्याच्या व्यवहारात मला कधीच देणं घेणं नसतं पण आदरातिथ्य आणि एकमेकांबद्दलचा आदर हे खरंच वाखाणण्याजोगं होतं.
त्या नंतर दोन्ही मुलींसाठी दिवाळी स्पेशल खरेदी. कधी सोनं तर कधी कपडे किंवा कधी घरात संसारोपयोगी वस्तू. हां हां म्हणता दोन्ही मुलींची लग्ने झाली. दोन्ही जावयांचे दिवाळसण आम्हीही साजरे केले. दिवाळीत नातवंडांसाठीही काहीना काही घेतले जातेच.
एकूण काय लहानपणच्या दिवाळीची मजा जशी वेगळी तशी लग्नानंतरच्या दिवाळीचीही मजाही औरच. बायको पाटावर बसून सुवासिक तेल उटणं, अंगाला लावणार आणि ओवाळणीसाठी औक्षण करणार. पूर्वनियोजन न करता त्यावेळी जे सुचेल ते मी ताम्हणात ठेवणार.



# मी पाहिलेली अमेरिकेतली दिवाळी



वसुंधरा पर्वते

दिवाळी जवळ आली आहे. दिवाळीपूर्वीची सर्वांची गडबड, गजबजलेले बाजार, मुलांच्या सुट्ट्या, सगळ्या घरातून येणारा बेसनाच्या लाडवाचा सुगंध, तळणीचा वास, झगमगणारे कंदील, रांगोळ्या या सगळ्या वातावरणाला मी अमेरिकेत असल्यामुळे मुकले आहे ही गोष्ट खरीच आहे पण त्याचा अर्थ असा नाही की इथे दिवाळी साजरीच होत नाही. ही वातावरणनिर्मिती मात्र होत नाही त्याचबरोबर प्रदूषणही होत नाही. दिवाळी कधी आहे हे कालनिर्णयमध्ये बघितलं तरच लक्षात येतं. दिवाळीच्या सुमाराला रस्त्यावरून जाताना ज्या घरांवर तोरण, कंदील, पणत्या दिसतात ती घरं भारतीय असतात. या दिवसात बहुधा इथे थंडीचा कडाका, गार वारे असतात त्यामुळे पणत्यांच्या ज्योती इलेक्ट्रीकच्या असतात. कधीकधी या कंदिलांच्या जोडीला आपल्याच घराबाहेर किंवा शेजारच्या घराबाहेर भुतंही असतात कारण तिथला हॅलोविनचा सण आणि दिवाळी अनेकदा एकाच वेळी येते. दिवाळीच्या शुभ दिवशी ते हाडांचे भयावह सांगाडे बघायला नको वाटतं पण तिथे वाढलेल्या आपल्या मुलांना दोन्ही सण तितक्याच उत्साहाने साजरे करायचे असतात.

मराठी, गुजराती, दाक्षिणात्य मंडळी आपापल्या मंडळात एकत्र जमून दिवाळी साजरी करतात. अर्थात हे कार्यक्रम दिवाळीच्या जवळपासच्या शनिवार-रविवारीच साजरे होतात. कारण दिवाळी म्हणून सुटी मिळण्याची शक्यता नसते. दिवाळीच्या निमित्ताने मंडळातर्फे गाण्याचे कार्यक्रम होतात. मग बासनात पडलेल्या जरीच्या साड्या आणि सिल्कचे कुर्ते पायजमे यांना हवा मिळते. रंगीबेरंगी साड्या नेसून नाकात नथ वगैरे अडकवून इथल्या मुली दिवाळी आनंदाने साजरी करतात. जमतील तसे फराळाचे पदार्थ करून आणतात, न वाजणारे फटाके वाजवतात. फुलबाज्या पेटवून त्या गोल फिरवण्यातली मजा घ्यायला लहानच असावं लागतं असं नाही, मोठी माणसंही त्यात आनंद घेतात. हल्ली तर मंडळातर्फे दिवाळी किल्ले स्पर्धाही घेतली जाते. काही कुटुंबं एकत्र येऊन दिवाळी साजरी करतात. अभ्यंगस्नान, सकाळचा फराळ करायचा असेल तर शनिवारपर्यंत थांबावंच लागतं. हल्ली मोठ्या शहरातून फराळाचे पदार्थ घरगुती किंवा भारतीय दुकानातूनही मिळू शकतात.

काहीजणी लाडू, चकल्या, शंकरपाळे घरी करतातही. भारतात दिवाळीच्या दिवसात लाडू-चिवडा समोर आला की नको म्हणणारीच माणसं जास्त. याउलट इथे वाढलेली मुलं शंकरपाळे, चकल्या तसंच भारतीय मिठाई आवडीने खातात.

मोठी माणसंदेखील आपली आई, आजी यांनी केलेल्या पदार्थांची आठवण काढीत फराळाचे पदार्थ चवीने खातात.  त्यातून घरी केलेल्या या पदार्थांना इथेच जास्त दाद मिळते असा माझा अनुभव आहे. हल्ली तयार भाजणी, लाचं तयार पीठ, जिलबीचं तयार पीठ, गुलाबजामचं इंन्स्टंट पीठ अनरशांचं पीठ, चिवड्याचा तयार मसाला असे पदार्थ इथल्या भारतीय दुकानात मिळत असल्यामुळे घरीही फराळ अणि पक्वान्नं बनवणं सोपं झालं आहे.

भारतीय वस्ती जिथे जास्त आहे तिथल्या शाळेतही हल्ली दिवाळी साजरी होते. दिवाळीचं पारंपारिक महत्व सांगायला एखाद्या चुणचुणीत मुलाला आईने तयार केलेलं असतं. भारतीय मुलांच्या आईबाबांनाही बोलवतात. इतर मुलंही भारतीय मिठाई-विशेषतः पेढे, लाडू कुतुहलाने खातात, त्यांना ते आवडतंही. त्यामुळे असं वाटतं की इथल्या बहुसंख्य शाळांना दिवाळीची सुट्टी मिळण्याचा दिवसही काही दूर नाही.

वसुंधरा पर्वते -
मुंबईच्या साठ्ये कॉलेजमध्ये ३४ वर्षं गणिताचं अध्यापन
गणिताच्या ११-१२ वीसाठी पुस्तकांचं लेखन
पाककलेवरील ७ पुस्तकांचं लेखन, तसंच अनेक नियतकालिकात लेखन.
सध्या वाचन व्रत ३०+३ हा व्हॉट्सऍपवर अभिवाचनाचा ग्रुप वैशाली पंडितसह चालवते.





# अमेरिकेतली दिवाळी



गौतम पंगू

‘बटाट्याची चाळ’ मध्ये पु.लं. नी चाळीच्या जीवनाचं एक प्रतीक म्हणून ‘डालड्याच्या डब्यातलं तुळशीचं रोप’ याचा उल्लेख केलाय. मुंबईतल्या एका गजबजलेल्या चाळीतल्या दीड खोल्यांच्या घरात राहणाऱ्या चाळकऱ्यांचा आपली संस्कृती जपायचा एक प्रयत्न म्हणजे हे रोप. तसं भारतातून अमेरिकेत आलेल्या आमच्यासारख्या लोकांच्या आयुष्याचं एक प्रतीक म्हणून एक गोष्ट नेहमी माझ्या डोळयासमोर येते - ती म्हणजे ऑक्टोबरमध्ये ‘हॅलोविन’ साठी कोरलेल्या भोपळयात लावलेली दिवाळीची पणती! हॅलोविन आणि दिवाळी हे सण नेहमी लागूनलागूनच येतात. हॅलोविन ३१ ऑक्टोबरला हे ठरलेलं असतं. यावर्षी तर नरकचतुर्दशी ३१ ऑक्टोबरला आणि लक्ष्मीपूजन १ नोव्हेंबरला - म्हणजे ३१ ला संध्याकाळी हॅलोविन संपला की घराबाहेर टांगलेली भुतंखेतं काढायची, भोपळे आत आणायचे आणि दिवाळीसाठी रांगोळी, पणत्या, आकाशकंदिलांनी घर सजवायचं. एकीकडं मायदेशाशी जोडलेली नाळ तुटू द्यायची नाही, पुढच्या पिढीवर भारतीय मानसिकतेला साजेलसे संस्कार व्हावेत असा शक्य तितका प्रयत्न करत रहायचा, आणि त्याचवेळी ज्या देशात राहतोय तिथल्या चालीरीतींनाही आपलंसं करायचं अशा दोन्ही डगरींवर हात ठेवून आम्ही ‘भारतीय अमेरिकन’ नेहमीच सांभाळून चालत असतो.

अमेरिकेत रहायला लागल्यावर एक गोष्ट आपोआप होते ती म्हणजे रोजच्या आयुष्यात वेगवेगळया देशांच्या, धर्मांच्या, वर्णाच्या लोकांशी संपर्क यायला लागतो. मनाची आणि जाणिवांची कवाडं उघडी ठेवून वावरलं तर या लोकांच्या संस्कृतीची, स्वभावांची, विचार करायच्या पद्धतींची ओळख व्हायला लागते आणि आपल्या स्वीकृतीच्या कक्षा विस्तारायला त्याची मदत होते. विशेषतः मुलं शाळेत जायला लागली की फक्त ख्रिसमसच नव्हे तर ज्यू लोकांचा हानुका, आफ्रिकन अमेरिकन लोकांचा क्वान्झा या सणांचीही माहिती मिळायला लागते. मागच्या काही वर्षांत आपल्या दिवाळीचीही सर्वसामान्य अमेरिकन जनतेला अधिकाधिक ओळख होत चालल्याचं जाणवतं. २००३ मध्ये जॉर्ज बुशनी ‘व्हाइट हाऊस’ मध्ये दिवाळी साजरी करायची पद्धत सुरु केली. ओबामांनी त्याचा विस्तार केला. अमेरिकेतल्या भारतीय वंशाच्या लोकांची संख्या वाढतच आहे आणि भारतीय खाद्यपदार्थांची लोकप्रियताही!

त्यामुळं आता आमच्या ऑफिसमध्ये दरवर्षी दिवाळी पार्टी असते आणि त्यात अमेरिकन्स उत्साहानं सहभागी होतात. आमच्या मुलीच्या शाळेतही तिचे (अमेरिकन) शिक्षक दिवाळीबद्दल माहिती सांगतात, सगळी मुलं मातीच्या पणत्या वगैरे बनवतात, यावर्षीपासून तर आमच्या भागात दिवाळीला शाळांना एक दिवसाची सुट्टीही मिळाली आहे!

इथल्या दुकानांत आता फटाकेही मिळायला लागलेत. मागच्या वर्षी तर आमच्या कॉलनीतली सातआठ भारतीय कुटुंबं मिळून आम्ही दिवाळी साजरी करत होतो, फटाके उडवत होतो, मिठायांवर ताव मारत होतो, तेव्हा आमचा मिशाळ धट्टाकट्टा अमेरिकन शेजारी बाहेर आला. हे महाशय पूर्वी पोलिसात होते, त्यामुळं 'इतका आवाज केल्याबद्दल पोलिसांना बोलावतो थांबा' अशी तंबी द्यायला बाहेर आला की काय असं वाटून आमची तंतरली. पण उलट तोच उत्साहानं आमच्या पार्टीत सहभागी झाला, फटाक्यांच्या माळाबिळा उडवायला लागला. मग त्याला दिवाळीचा अर्थ, त्याचं महत्व याबद्दल चार शब्द ऐकवले. "व्हेरी गुड ट्रॅडिशन!" तो म्हणाला.
आणि दिवाळीचा किंवा आपल्या बाकीच्या सणांचा सर्वत्र प्रसार व्हावा अशी आपली इच्छा असेल तर असाच मार्ग स्वीकारायला हवा असं मला वाटतं. दरवर्षी ख्रिसमस आला की व्हाट्सऍपवर ठराविक संदेश फिरायला लागतात - आपण कशाला ख्रिसमसचं कौतुक करायचं? कशाला हवी ती ट्री आणि त्या भेटवस्तू? सॅंटाक्लॉजची वाट बघणाऱ्या आपल्या मुलांना/नातवांना वासुदेवाबद्दल सांगा, आपल्या संस्कृतीचा विसर पडू देऊ नका वगैरे वगैरे... पण ख्रिसमस जगभरात लोकप्रिय होण्याचं एक कारण म्हणजे कुठलंही कर्मकांड न करता, चर्चमध्ये न जाता, कुठल्याही धर्माच्या लोकांनी तो कसाही साजरा केला तरी चालतो, लगेच कुणी 'आमचा धर्म बुडला' अशी हाकाटी करत येत नाही. आणि अर्थातच दुसरं कारण म्हणजे ख्रिसमस ट्री, सजावट, भेटवस्तू अशा गोष्टींचा त्यात केलेला अंतर्भाव आणि त्याला धरून होणारं प्रचंड मार्केटिंग! कुठल्याही सणाचं अति बाजारीकरण होणं अयोग्यच, पण कुठल्याही सणाला रीतीरिवाजांच्या आणि कर्मकांडाच्या बंधनात जखडणंसुद्धा तितकंच चुकीचं! एखाद्या सणामागचा भाव समजून घेत जर तो हसतखेळत, सोप्या आणि आकर्षक पद्धतीनं साजरा केला, त्यानिमित्तानं वेगवेगळ्या लोकांनी एकत्र येऊन चार घटका मजेत घालवल्या तर त्याचं महत्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोचायला मदत होते. परदेशातली दिवाळी सध्या अशीच साजरी होते आहे, अभारतीयांनाही त्यात सहभाग घ्यायला मनापासून आवडतंय, आणि त्यामुळं जगातल्या अधिकाधिक लोकांची आयुष्यं दिवाळीच्या प्रकाशानं उजळत जातील याचा विश्वास वाटतो!

गौतम पंगू यांनी रसायन अभियांत्रिकी क्षेत्रात पीएचडी केली असून ते अमेरिकेत औषधनिर्माण क्षेत्रात संशोधन करतात. विविध प्रकारचं मराठी लेखन- कथा, ललित, माहितीपर लेख - हा त्यांचा आवडता छंद आहे. विशेषतः स्थलांतरितांच्या आयुष्याचे वेगवेगळे पैलू त्यांना आपल्या लेखनातून हाताळायला आवडतात.

फेसबुकवरील लेखनाबरोबरच त्यांच्या कथा आणि लेख आजवर साप्ताहिक सकाळ, अंतर्नाद, कालनिर्णय, ऐसी अक्षरे, प्रसाद, जत्रा, बृहन्महाराष्ट्र मंडळ वृत्त, रंगदीप अशा अनेक भारतातून आणि अमेरिकेतून प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांतून सातत्याने प्रसिद्ध झालेले आहेत . २०२० मध्ये अमेरिकेतल्या अनुभवांवर आधारित ‘पूल’ हे सदर त्यांनी ‘लोकमत’ मध्ये लिहिलं होतं. ‘स्टोरीटेल’ या ऑडिओबुक प्रकाशित करणाऱ्या प्लॅटफॉर्मसाठी त्यांनी गोष्टी लिहिल्या आहेत, तसंच Shank’s आणि DNA या अमेरिकेत बनलेल्या मराठी चित्रपटांचं पटकथा लेखनही त्यांनी केलं आहे. 'रिकामपणच्या गोष्टी' हे त्यांचं पुस्तक नुकतंच प्रसिद्ध झालं आहे. त्यांचं वास्तव्य सध्या फिलाडेल्फिया शहरात आहे.

# आमच्या दिवाळीची कहाणी!





**डॉ. मेधा फणसळकर.**

“ दादा, दादा... त्या बघा दोघीजणी आता ऍटमबॉम्ब लावणार. मी सांगणारे आईला... बाबा$$... दादा$$...नका ना फटाके वाजवू" असे किंचाळत कान बोटाने गच्च दाबून तोंडाने जेवढ्या जोरात बोंब मारता येईल तितक्या मोठ्या आवाजात माझे भोकाड चालू असायचे.

तेवढ्यात बहीण आतून एक लाडू घेऊन बरोब्बर माझ्या उघड्या मुखकमलात घुसवत असे आणि तेवढ्या वेळात अस्मादिक आवाज काढू शकत नसल्यामुळे थोडा वेळ त्या दोघींना बिनधास्त फटाके वाजवायला मिळत.कारण एकदा का हे प्रकरण दादांच्या म्हणजे आजोबांच्या कोर्टात गेले तर आपल्या फटाके उडवायच्या बेतावर पाणी फिरणार हे त्यांना माहीत असायचे.

मी मात्र तोंडातला लाडू बाहेर टाकला तर आईकडून धम्मकलाडू मिळेल या भीतीने तो खाता खाता माझे प्रयत्न जारी ठेवत असे. “दाँदाँ... दाँदाँ..." असे आवाज काढले तरी त्याचा व्हॅल्यूम आणि जोर कमी झालेला असे. तेवढ्या वेळात दोघी बहिणी आपले काम आटोपून येत आणि मग मला घेऊन फुलबाज्या, झाडं, केपा, नागोबा असल्या छोट्या-मोठ्या दारूगोळयांनी मला खुष करीत. किमान काही वेळ तरी सगळया पक्षांची युती होत असे. पण कधी कोणता पक्ष बाहेर पडेल याची घरच्या सरकाराना काळजी लागली असे. कारण ते निस्तरेपर्यंत त्यांच्या नाकीनऊ येत असे. एक वेळ युती सरकार चालवणे सोपे कारण ते या नाहीतर त्या पक्षाशी युती करून तरी राहतील. पण आमचा अपक्ष उमेदवार एकदा फुटला की कोणताच पक्ष त्याच्याशी युती करायला तयार नसे. त्यामुळे शेवटी राष्ट्रपती राजवट लागू करण्याशिवाय पर्याय रहात नसे. एकूण पहिल्या दिवसाची पहाट तरी आनंदाने पार पाडलेली असे.

सकाळी फराळ झाला की एकमेकांच्या घरी फराळ पोचवायची लगबग सुरू व्हायची. दुसऱ्यांच्या घरातून आलेल्या फराळाची छाननी करणे हा एक आमचा आवडता उद्योग असे. एकदा एकांकडून लाडू आले होते. इतके छान दिसत होते की खायचा मोह काही आवरेना. म्हणून आधी तोंडात घातला तर व्हीकोची पेस्ट लावून मजबूत असणाऱ्या माझ्या दातांनी पण शरणागती पत्करली. मग शेवटी हातातोंडाशी गाठ पडावी म्हणून हाताला मदतीला घेतले. पण बापड्या लाडवाला जन्मदात्रीने इतके मजबूत बनवले होते की त्यापुढे फेवीकॉलचा मजबूत जोड सुद्धा फिका पडला असेल. सगळे प्रयत्न करून झाले. शेवटी स्वयंपाकघरातला बत्ता घेतला आणि लाडू जमिनीवर ठेवून जीव खाऊन घाव घातला तर तो पठ्ठ्या इतका लबाड की तिथून उडी मारून खिडकीच्या काचेच्या फिल्डरला नेस्तनाबूत करून डायरेक्ट सिक्सरच्या दिशेने त्याने वाटचाल सुरू केली. त्यानंतर मात्र घरातल्या अंपायरनी षटकार घोषित न करता पोळया करायचे सोडून लाटण्यानेच आमच्या पाठीचा वेध घ्यायचा प्रयत्न केला. ते बघून पी.टी. उषाला पण आपण रनिंग करतो याची लाज वाटेल इतक्या जोरात आम्ही मैदानातून धूम ठोकली. दुपारी सगळी आघाडी जरा शांत झाल्यावर पुन्हा पुढच्या पदार्थांचे परीक्षण सुरू केले.

एक चकली काढली आणि त्याचा तुकडा मोडायला सुरुवात केली तर लोकरीचा गुंडा जसा पूर्ण उलगडतो तशी ती उलगडली गेली. मग मज्जा वाटून आम्ही उरलेल्या दोन पक्षांकडे जाऊन सांगितले,“ आपल्याकडे शेजारच्या काकूंनी तिखट च्युइंगम पाठवले आहे.

तुम्हाला हवे आहे?" त्याही उत्सुकतेने आल्या आणि मग आम्ही चकलीचे च्युइंगम, एक कडबोळे खा दात शाबूत राहिल्यास एक लाख रुपये मिळवा, अर्धा तास गरम चहात भिजवले तरी अजिबात मऊ न पडणारे शंकरपाळे अशा वेगवेगळया आयटमना आणि त्यांच्या जन्मदात्रीना दुवा देत परीक्षण पूर्ण करत असू. आमच्या जन्मदात्रीला मात्र आपण सुगरण असल्याचा पश्चात्ताप होत असे.

बघता बघता आमच्या अशाच अनेक दिवाळी निघून गेल्या. घरच्या सुगरणीच्या हाताखाली शिकून आम्हीही थोडया थोड्या तयार झालो होतो आणि कधीतरी “ दिसते मजला सुखचित्र नवे...." च्या उंबरठ्यावर पोहचून एकदाचा उंबरठा ओलांडला. उंबरठा ओलांडायच्या आधीपासूनच जन्मदात्रीच्या सूचना चालू असायच्या,“ तिकडे तरी आता जबाबदारीने वागा. उगीच चकलीचे च्युइंगम, लाडवाचा चेंडू असल्या गमती खेळत बसू नका......." इ. इ. अनेक कानमंत्र दिलेले असल्याने आणि लग्नानंतरची पहिली दिवाळी असल्याने माझ्यासारख्या आदर्श सुनेने सासूबाईंना विचारले,“ आई, आता दिवाळीला काय काय करायचे?" त्यांनी उत्तर देण्यापूर्वीच आमचे भाऊजी आणि अहो यांनी सुरुवात केली,“ आई, बाकी काय हवे ते तुम्ही करा पण गोड आणि तिखट नानापाळे हवेतच. “अरेच्या, आता हा नानापाळे हा काय प्रकार आहे?" असे माझ्या मनात आले. या कोकणातल्या लोकांचे अजबच प्रकार दिसताहेत. धोंडस, खिमट, सांदण, खतखत, खिची भाजी अशा प्रकाराना जरा मी सरावत होते तोपर्यंत हे नानापाळे नावाचे नवीन प्रकरण उपटले होते. तेवढ्यात आई म्हणाल्या,“ उद्या आता पहिल्यांदा तेच करू या." मला तर दुसरा दिवस कधी उगवतो असे झाले होते. कधी एकदा ते नानापाळे बघतेय असे मला झाले होते. दुसऱ्या दिवशी उठल्या उठल्या मी आईना विचारले,“ आई, कसे असतात हो हे नानापाळे? कशाचे करतात? आणि वेगवेगळया आकाराचे असतात म्हणून त्यांना नानापाळे म्हणतात का?" हे ऐकून घरातल्या सगळयांनीच हसायला सुरुवात केली आणि मग आईनी उलगडा केला की आमच्या घरातील एका ज्येष्ठ नातेवाईकांचे नाव शंकर होते.त्यांना सगळेजण नाना म्हणत. ते अतिशय मिश्किल होते. त्यामुळे शंकरपाळी केली की ते स्वतःच म्हणत “आज नानापाळी खायची आहे बरं का!" त्यामुळे आमच्या घरात शंकरपाळी ऐवजी नानापाळी असाच शब्द रूढ झाला होता.

तशी जात्या मी मुळीच प्राणिप्रेमी नाही बरं का!

म्हणजे भूतदया वैगरे आहे माझ्याकडे पण आमची भूतदया लांबून प्राण्यांना खाणं घालण्याएवढीच मर्यादित! दुर्दैवाने सासरी मात्र सगळे प्राणिप्रेमी!

नवीनच लग्न झाले असल्याने आणि एकमेकांवर प्रचंड प्रेम असल्याचा काळ असल्याने नावडत्या गोष्टी पण आवडत्या मानून घेणे चालले होते. अशातच दिवाळीच्या आधी वसुबारस आले. नवऱ्याने निगुतीने पाळलेली गाय आणि वासरू दारातच होती. सासूबाईंनी सांगितले,“ आज पूजा कर ग गाय- वासराची! दरवर्षी मी करते. आता यंदापासून तू कर." मी हो म्हटले खरे. पण त्या गाईसमोर उभे राहण्याची पण माझी हिम्मत होत नसे. तिथे पूजा कसली करणार? तरी नवऱ्याला सोबत घेतले, कसाबसा धीर गोळा केला आणि पूजेचे सामान घेऊन गोठयाजवळ गेले. नवरा आत जाऊन उभा राहिला आणि गायीच्या पाठीवरून हात फिरवू लागला. तीसुद्धा प्रेमाने त्याचा हात चाटू लागली. मी आत प्रवेश केला मात्र एखादा नवीनच प्राणी पहिल्यासारखे त्या गायीने मारक्या म्हशीसारखा लूक दिला आणि शिंगे माझ्या दिशेने उगारली. ते बघितल्यावर गर्भगळीत होऊन मी पूजेचे तबक तिथेच टाकले आणि जी पळून गेले ते आजतागायत गाईची पूजा करायची हिम्मत केली नाही.

लहान असताना सगळयांच्या फराळाची छाननी करणारी मी अंगावर पडल्यावर ते पदार्थ करणाऱ्या जन्मदात्रीची माफी मागू लागले. कारण पदार्थ जन्माला येताना काय-काय खटाटोप करायला लागतो याची हळूहळू कल्पना यायला लागली होती. तरीसुद्धा अतिआत्मविश्वास कधीतरी घात करायचाच. एका दिवाळीत चकल्या करायला घेतल्या. आम्ही दोघी जावा आणि सासूबाई अशी आमची नेहमीची टीम! पीठ बघून सासूबाई आधीच म्हणाल्या,“ मला जास्त वाटतंय हे. जरा कमी कर. लागलं तर पुन्हा भिजवू या." त्यावर मी म्हटले,“ चकली सगळी आवडीने खातात. द्यायला- घ्यायला पण लागतात. म्हणून जास्त घेतलंय पीठ आणि आपण तिघी आहोत ना? मग होऊन जातील पटकन! आणि मुलं, भावजी,हे पण मदत करणार आहेत असं म्हटलेत." असं म्हणून सगळयांना हाक मारली. आमचे सर्व टीममेम्बर उत्साहाने हजर झाले. थोडावेळ लेकीने चकल्या पाडून दिल्या. पण लवकरच हा मेम्बर घायाळ झाला. “ शी बाई, आई, माझे गोल का होत नाहीयेत तुझ्यासारखे? किती जोर लावावा लागतोय!" असं म्हणत हात दुखतात या सबबीवर तिने टीमला बाय केले. “ या अशा गोल- गोल चकल्या करण्यापेक्षा आपण डायरेक्ट तेलात साच्याने सोडल्या तर?" “ त्यापेक्षा लांब एकच रेषा करू या आणि त्याचे लहान लहान तुकडे करू या. हल्ली चकणा म्हणून अशाच चकल्यांचे तुकडे देतात" एकेकाचे तारे तोडणे चालू होते. कारण चकल्यांचा घाट घातला त्याच दिवशी नेमकी भारत- पाकिस्तान वर्ल्ड कपची सेमीफायनल होती.

ती बघण्यात सगळ्यांना जास्त रस होता.त्यामुळे ती सुरू झाल्यावर पुरुषवर्गापैकी एकेकाने हळूहळू काढता पाय घेतला . रात्रीचे दहा वाजून गेले तरी चकल्याचे पीठ काही संपायला तयार नाही.

हे बघून शेवटी सासूबाईनी पण शस्त्रे खाली ठेवली. क्षणभर मला असे वाटू लागले की हे चकल्यांचे पीठ भिजवले आहे ती परात म्हणजे द्रौपदीची थाळी तर नाही ना? त्यातला पिठाचा डोंगर कमीच झाल्यासारखा वाटत नव्हता. सगळीकडे सामसूम झाली तरी आमच्या चकल्या चालूच होत्या. मी व जाऊबाई तो ढीग नजरेत साठवत साठवत शेवटपर्यंत खिंड लढवत होतो. अगदीच घायाळ झाल्यावर सगळी शस्त्रे बाजूला ठेवली आणि उरलेल्या पिठाचे भराभरा वडे करून एकदाची लढाई पूर्ण केली.

तर अशा अनेक लढायाना तोंड देत देत आता आमची दिवाळी समृद्ध झाली आहे. ती जशी आम्हाला प्रसन्न झाली तशी तुम्हा सर्वांना होवो. अशी ही आमची दिवाळीची कहाणी सुफळ संपूर्ण!

# श्रीमंत संदर्भांची दिवाळी.





सुगंधा शिरवळकर, पुणे

आमच्या लहानपणी आकाशकंदील घरीच केला जायचा. त्याच्या कमच्या तयार करून घ्याच्या, त्याना थोडंफार लाखायला लागयच नाही तर कुस हातात घुसायच. रंगीत कागद ज्याला जिलेटीन पेपर म्हणायचे. त्याचे कोपरे वेगवेगळ्या नक्षी तयार करून खळीने किंवा जिंकाने चिकटवायचे. खूप मजा यायची. स्वतःला आत्मिक समाधान मिळायचे. पडक्या वाड्यात जाऊन माती खणून घमेल्यात घेऊन यायची.

विरा-मातीचा किल्ला तयार करायचा. (यावरली घरे ठेवायला लागयची ती पण जाड पेपरची बनवायची हे सगळं करताना शाळेची परीक्षा पण असे. ते सांभाळून हे उद्योग चालायचे.

मुली त्याची भातुकली मांडत असत. फार मजा येत असे. आता जरा कमी झाले आहे. कित्येकजण तर अजून किल्ले करतात पण त्यात आज वेगळे पण आले आहे.
आमच्या वेळी हरतहेच्या बंदुका नसत. त्यामुळे टिकल्याची डबी खिशात घालून एखादा दगड शोधायचा आणि ठक-ठक करत खूप वेळ त्यात धावायचा आता सारख्य। वेगवेगळया रंगीत पणत्या नव्हत्या. रांगोळी मध्ये रंग भरणे कलात्मक असायचे रोजच्या रोज रांगोळी कोणती काढायची ते ठरवले जायचे आणि ती सुद्धा ठिपक्याची सरळ एका ओळीत ती पण परिक्षाच असे.
थंडीच्या दिवसात सकाळी सकाळी फिरायला जायला किती सुंदर वाटे. फक्त पुरुष आणि मुलांनाच का बरे अभ्यंगस्नान बंधन कारक? मुली बायका नरकात गेल्या तरी चालते का? हा प्रश्न मात्र आजही अनुत्तरीत आहेच. मोठी माणसे फटाके घेऊन यायची सर्वांना सारखी वाटून द्यायची. पाडव्याला बाबा आई-आजीला ओवावणी घालायचे. दोघींचे चेहरे तृप्त झाल्या सारखे दिसत. बहिणीं साठी बाबा आम्हाला मुलांना काही पैसे देन असे तेच परत परत तबकातून काढून भाऊ आम्हाला देत असे. तरी त्याही वेळी चेहऱ्यावर तुप्तीचे भाव असत आता लोकांचे समाधान होत नाही किती केले तरी.
साधी राहणी, सोपे अन निरागस दिवस होते ना ! नव्हती स्पर्धा, नव्हता दिखावा होते फक्त प्रेम प्रेम आणि प्रेम. मला तर आठवतं आजी नेहमी एक गोष्ट सांगायची,
की आपण दिवाळी का साजरी करतो. ते फार छान समजून सांगायची. रामायणात असे सांगितले की लंकेचा राजा रावणाचा वध करून जेव्हा भगवान श्रीराम पत्नी सीता आणि लक्ष्मण यांच्या सह अयोध्येला परतले तेव्हां संपूर्ण आयोध्या नगरी दिव्यानी उजळून निघाली. रामाच्या आगमनाने प्रत्येक घरात, गावतले दिवे लावले गेले. तेव्हांपासून दिवाळीचा सण अंधारावर विजय मिळून मिळवण्याचा सण बनल
ज्या दिवशी भगवान धन्वंतरी यांचा जन्म झाला, त्यादिवशी धनत्रयोदशी साजरी करण्यात येते. कृष्णानं नरकासुराचा वध केला म्हणून नरक चर्तुदशी साजरी केली जाते. घरातील धन-दौलत समृध्दी कायम राहवी यासाठी लक्ष्मीपूज केले जाते. बली राजाचा नाश केोत्याचे प्रतिक म्हणून बलीप्रतिपदा साजरी केली जाते. शटका सुराचा वध करून असंख्य भगिनीना आणि त्यांच्या भावाला सोडवल्यानंतर भाऊबिज साजरी करण्याची प्रथा आहे
या सर्व गोष्टी आता मुलांना सांगणे आवश्यक वाटते.आपल्या पूर्वापार प्रथांचे श्रीमंत संदर्भ त्यांना कळायला हवेत.आमच्मासारख्या ज्येष्ठ नागरिकांची ती जबाबदारी आहे असं मी मानते.

# दिवाळीच्या सणा..!



श्री. गिरीधर पुजारे.
( ज्येष्ठ रंगकर्मी, मुंबई,
पळसंब ( सिंधुदुर्ग)

दिन दिन दिवाळी ,
गाय म्हशी ओवाळी..
गाय म्हशी कुणाच्या,
लक्ष्मणाच्या.
दे माई खोबऱ्याची वाटी,
वाघाच्या पाठीत,
घालीन काठी."

ह्या ओळी आणि संदर्भ लक्षात घेता मुळात दिवाळीची सुरुवात वसुबारस ने होते, हे लक्षात येते. तेहतीस कोटी देवता जिच्यात सामावलेल्या असतात त्या गो मातेची पूजा करून आपल्या पवित्र, मंगल आणि आनंदी सणाला सुरुवात होते. माझा जन्म कोकणातील एका छोट्या गांवात झाला त्यामुळे श्रीमंती नसताना सुद्धा मनाची श्रीमंती होती. गणपती नंतर येणारा उत्साहाचा दुसरा मोठा सण दिवाळी...! आताच्या काळाइतका इतका झगमगाट नसला तरी उत्साह भरपूर होता. बांबूच्या काठ्या आणून रंगीत पेपर लावून स्वतः बनविलेल्या कंदीलाची मजा औरच होती. त्यानंतर तुळशीच्या बाजुला काठी बांधून दोरीच्या सहाय्याने तो वर लटकून ठेवायचा. तेव्हा वीज नसल्याने आत एक पणती पेटवून ठेवली जात होती. कोकणात असेच कंदील तुम्हाला घरोघरी दिसत असत. शेणाने सारवलेली अंगणं आणि सफेद दगड फोडून केलेल्या रांगोळया दारादारत असतात. नरकचतुर्दशी, लक्ष्मी पूजन, भाऊबीज असे एका पाठोपाठ येणारे सण आनंद मिळवून देत होते. अभ्यंगस्नानदिवशी घरातील बनविलेले उटणे लावून आंघोळ करून कारिट फोडायचे त्याची एक बी डोक्याला लावायची आणि जिभेला लावायचे. त्यावेळी एवढं कडू तोंड व्हायचे की अजूनही त्या आठवणीने शहारे येतात...! त्या नंतर सातवनाची साल वाटून त्याचा रस दिला जायचा. जेणेकरून तुम्हाला कसलीही रोगराई होऊ नये. मग एक बेसनचा किंवा रव्याचा लाडू मिळे.  आज सगळच बदलून गेलंय. बाजारात एवढया मिठाया आल्या की काय खाऊ काय नको असे झाले.

दिवाळीच्या सुट्टीत आकाशवाणीवर त्या वेळी जुनी नाटकं लागायची. मग अंगणात बसून सर्व कुटुंब ते ऐकत होतो. पुढे भाऊबीज पाडवा हे साध्या पद्धतीने म्हणजे फक्त ओवाळून पूर्ण व्हायचा. आज येणाऱ्या उत्पन्नाच्या दुप्पट खर्च केला जातो. आता पूर्ण दिवस बदललेले आहेत सगळीकडे झगमगाट झाला.

कपडे मिठाई गिफ्ट, रुसवे फुगवे असे प्रकार वाढू लागले आणि ह्यात आपल्या दिवाळीचा खरा आनंद आपण गमावू लागलो.

आज तो पूर्वीचा निर्भेळ 'दिवाळी आनंदाचा' मातीचा सुगंध कधी मिळेल याची मन आशेने वाट पहात आहे.



